## (अनुभव कथन)

# तिसऱ्या मजल्याच्या खिडकीतून खाली पडूनही....

*- अनिमावीरा शेट्टीगार, मस्कत*

---

तिसऱ्या मजल्यावरून ७ वर्षांचा मुलगा खिडकीतून खाली पडल्यावर कोणाच्याही मनात नको तेच विचार येतील, नाही का? पण जेव्हा, हा मुलगा इतक्या उंचीवरून पडल्यावरही काहीही इजा न होता, सुखरूप होता असे निदर्शनास आले तेव्हा स्थानिक डॉक्टर, घराजवळचे रहिवाशी, एवढेच नाही तर प्रथमदर्शनी हा अपघात पाहणारे लोक, ह्या सर्वांच्या मनाची काय अवस्था झाली असेल? सद्‌गुरुकृपेची लीला कुठल्याही प्रतिकूल परिस्थितीत कशी काम करू शकते ह्याची थोडीफार जाणीव हा अनुभव वाचल्यावर होते.

---

हरि ॐ. माझं नाव अनिमावीरा शेट्टीगार, मी मस्कतला असते. आज जो अनुभव मी तुम्हाला सांगणार आहे तो ६ सप्टेंबर २००५ चा अनुभव आहे. त्यावर्षी ७ सप्टेंबरला गणेश चतुर्थी होती. गणपती बाप्पाचे आगमन होणार होते, त्याच्या अगदी एक दिवस आधीच ही घटना घडली.

माझा मुलगा अखिल त्यावेळी ७ वर्षाचा होता. त्या दिवशी दुपारी तो शाळेतून घरी आल्यावर मी त्याला झोपवले होते. माझ्या काही तब्येतीच्या तक्रारींमुळे डॉक्टरांनी मला रोज काही मिनिटे चालण्याचा व्यायाम सक्तीचा केला होता. माझा चालायला जायचा तो अगदी दुसराच दिवस होता, पण मुलगा अजून झोपून उठला नव्हता, म्हणून मी द्विधा मन:स्थितीत होते की मी चालायला जाऊ की नको? जर मी आत्ता ह्याला उठवले, तर उठल्यानंतर त्याची उगीचच चिडचिड...मग त्याला शांत करून, त्याचे सगळे आटपेपर्यंत माझा खूप वेळ जाईल.... मी काय करू???

गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आम्ही खूप उत्साही होतो, कारण मुंबईहून पहिल्यांदाच गणपतीची मूर्ती मस्कतला आणली होती. तो गणेश-ोत्सवाच्या आदला दिवस असल्यामुळे, त्या दिवशी संध्याकाळी आम्हाला केंद्रात सजावटीसाठीही जायचे होते. विचार केला की 'आता हा उठणार कधीऽऽ??...मी चालायला जाणार कधीऽऽ??... मग मला केंद्रात जायलाही उशीर होईल. तेव्हा हा झोपला आहे ना...तर ह्याला झोपवूनच ठेवते आणि मी पटकन्‌ खालून दोन फेऱ्या मारून येते. घरातून निघताना फक्त मनातल्या मनात बापूंना सांगितले, ''बापूऽऽ! अखिल झोपलाय, त्याच्याकडे तुम्ही जरा लक्ष द्या, मी जाऊन येईपर्यंत त्याला तुम्ही झोपवूनच ठेवा, अजिबात उठवू नका आणि त्याच्याकडे पूर्ण लक्ष द्या हं! बापू, प्लीज''.... असे म्हणाले आणि मी फेरी मारायला गेले.

माझ्यासोबत माझी शेजारीण होती. आमची बिल्डींग अगदी रस्त्याला लागूनच होती आणि फुटपाथ अगदी जवळ म्हणजे माझ्या बिल्डींगच्या विरुद्ध दिशेला होता. त्यामुळे विचार केला की पटकन्‌ दोन फेऱ्या मारून येऊ, तोपर्यंत हा झोपून राहील.

माझी एक फेरी पूर्ण झालीच होती. तेवढ्यात त्याला जाग येऊन तो खिडकीत आला होता. त्याने मला बघून खिडकीतून 'मम्मी-मम्मीऽऽऽऽ' अशी हाक मारली. मी फुटपाथवरूनच त्याला इशारा केला की 'थांब! मी परत येते'; कारण माझा आवाज तिसऱ्या मजल्यापर्यंत पोहोचू शकत नव्हता.

त्याला एवढे सांगून मी दुसरी फेरी मारायला गेले. दुसरी फेरी मारून आम्ही अर्ध्या रस्त्यात असतानाच माझ्या शेजारणीने बघितले की तिच्या नवऱ्याच्या हातात एक मूल आहे आणि तो टॅक्सीत बसतोय. ती खूप घाबरली आणि मला म्हणाली, ''अरेऽऽ, मेरे बच्चे को कुछ हो गया है, मैं भाग रही हूँ।'' मला मात्र काहीच दिसले नाही. ना तिचा नवरा दिसला, ना तिचा मुलगा दिसला. ती म्हणाली, ''अपने बिल्डींग के यहाँ देखो कितनी भीड हो गई है!'' मी म्हटले, ''कुठे?''

तशी आमच्या बिल्डींगजवळ बऱ्याच कामगार लोकांची गर्दी दिसत होती, पण 'असेल काहीतरी नेहमीचे काम' असे म्हणून तिकडे फारसे लक्ष न देता मी एकदम शांतपणे माझी फेरी पूर्ण केली आणि बिल्डींगच्या आत आले. तेवढ्यात माझी मैत्रिण माझ्या मागून धावत आली. ती अक्षरश: थरथर कापत होती. तिचा हात थरथरत होता, तिला धड बोलताही येत नव्हतं. मी तिला विचारले, ''क्या हुआ रे''? तेव्हा माझ्या पाठीवर हात फिरवत म्हणाली, ''अरे!... अखिल उपर से नीचे गिर गया।''

''क्याऽऽ?''....त्या एका क्षणाला मला ब्रह्मांड आठवले! मी सुन्न झाले, तरीही बापूंच्या कृपेने मी कशीबशी तिसऱ्या मजल्यापर्यंत चढून वरती जाऊ शकले. माझ्या फ्लॅटचे दार उघडून बघते तर काय....खिडकी सताड उघडी....घरामध्ये दिवे चालू....पण अखिल कुठे दिसेना. माझ्या पायाखालची जमीनच सरकली. मी धीर करून खाली वाकूनही बघितले, तर काहीच दिसले नाही. मी शेजारणीला विचारले तेव्हा ती पुन्हा म्हणाली, ''हाँ रे! अखिल ही नीचे गिर गया है। मेरे पति उसे ही लेकर हॉस्पिटल गये हैं।'' तोपर्यंत माझा विश्वासच बसत नव्हता कारण घराची खिडकी एकदम खाली नव्हती. भिंतीपासून खिडकीची उंची बऱ्यापैकी होती.

पण शेजारणीने एवढे सांगितल्यावर मी इतकी ओक्साबोक्सी रडायला लागली की मला वाटले....गेले माझे मूल आता....कारण तो तिसऱ्या मजल्यावरून पडला होता. बिल्डींगच्या खाली असलेले कोठार...पार्किंगची जागा...तिथे असलेल्या लोखंडाच्या सळ्या....माझी आशा मावळत चालली होती.

तेवढ्यात तिच्या नवऱ्याचा तिला पुन्हा फोन आला. त्यानंतर ती मला म्हणाली, ''डर मत रे! मेरा पति बोल रहा है की उसको कुछ नही हुआ है।'' मी म्हटले, ''तो खोटे बोलत आहे.... शक्यच नाही....''

मला काहीच सुचत नव्हते. अशा आणीबाणीच्या प्रसंगाच्यावेळी माझे मिस्टरही जवळ नव्हते. ही घटना घडली तेव्हा ते दुसऱ्या शिफ्टसाठी ऑफिसला गेले होते. मस्कतला सकाळ ते दुपार व दुपारी ४.०० ते संध्याकाळी ७.०० अशी शिफ्ट ड्युटी असते. त्यांना फोन करून कसे सांगू हे मला कळत नव्हते. मी त्यांना फोन केला आणि एवढेच सांगितले की ''अखिल वरून खाली पडलाय आणि त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले आहेत.''

हे ऐकून मिस्टर एकदम स्तब्ध झाले. त्यांनी विचारले, ''कुठले हॉस्पिटल??'' मला हॉस्पिटलचे नावही माहिती नव्हते, ते मी शेजारणीकडून माहिती घेऊन त्यांना सांगितले. ते ऑफिसमधून तडक हॉस्पिटलला पोहोचले.

दरम्यान संध्याकाळी साडेसहाची वेळ होती, म्हणून मी बापूंसमोर दिवा लावला आणि घोरकष्टोद्धरण स्तोत्र म्हणायला सुरूवात केली. मी कसे म्हणत होते हे माझे मलाच कळत नव्हते. शब्दांकडे माझे नीट लक्ष लागत नव्हते, फक्त मी सतत घोरकष्टोद्धरण स्तोत्र म्हणतेय एवढेच मला माहीत होते.

मधून मधून रडत रडत मी अक्षरश: बापूंशी भांडत होते. बापूंना म्हणत होते, ''काय हो बापू! तुमच्या भरोशावर आज मी माझ्या मुलाला झोपवून गेले, जायच्या आधी मी तुम्हाला सांगितले होते ना, की तो झोपलाय, त्याला झोपवून ठेवा. तो उठला तर तुम्ही त्याला त्या खिडकीमधून का जाऊ दिलेत? बापू! हे ठीक नाही झाले. आता माझा मुलगा गेला ना माझ्या हातून....आता मी काय करणार, बापू!....''

मी स्तोत्र म्हणता म्हणता अशी बापूंशी मनात भांडत होते, तेवढ्यात मिस्टरांचा मला फोन आला. ते म्हणाले, ''अगं! अखिलला काहीच झालेले नाही, तो व्यवस्थित आहे, बोलतोय.''

माझा विश्वासच बसेना. मला वाटले, मला एकदम धक्का बसू नये म्हणून हे अशी सुरुवात करताहेत. मी म्हटले, ''हे शक्यच नाही, तिसऱ्या मजल्यावरून तो मुलगा पडला आणि तुम्ही म्हणता तो व्यवस्थित आहे?'' मग मी मिस्टरांना म्हणाले, ''मला त्याच्याशी बोलायचे आहे.'' तेव्हा ते म्हणाले, ''अगं खरंच! फक्त आत्ता बोलता येणार नाही कारण डॉक्टर त्याचे मशिनमध्ये स्कॅनिंग करत आहेत. त्याला बाहेरून काहीच जखम झालेली नाही आहे परंतु आतमध्ये कुठे हाड मोडलेय का? किंवा मेंदूला काही अपाय झाला आहे का? हे तपासण्यासाठी त्याचे स्कॅनिंग करत आहेत, त्यामुळे मीसुद्धा बाहेरच बसलो आहे.'' मी म्हटले, ''ठीक आहे, मी घरी पठण करते.''

फोन ठेवला आणि बापूंना म्हटलं, ''आय ॲम सॉरी बापू!'' मी बापूंशी एवढी भांडले होते, पण माझा मुलगा त्या सद्‌गुरुतत्त्वाने इतक्या भयप्रद प्रसंगातूनही वाचवला होता.

अर्थात अखिलशी प्रत्यक्ष बोलेपर्यंत माझा विश्वास बसणार नव्हता की तो वाचला आहे.

नंतर माझ्या मिस्टरांचा मला फोन आला की अखिलला बाहेर आणले आहे आणि अखिल माझ्यासोबत बोलला. जेव्हा मी त्याचा 'मम्मी!' हा शब्द ऐकला तेव्हा वाटले की.... हा जिवंत आहे???.... मग विचार आला की जिवंत असला तरी काहीतरी शारीरिक इजा नक्की झाली असणार. त्याला प्रत्यक्ष बघूनच माझी खात्री होणार होती.

पण इथल्यासारख्या रिक्षा वगैरे तिथे नसल्यामुळे, रात्री आठ वाजता मिस्टरांचे मित्र मला हॉस्पिटलला घेऊन जायला आले, तेव्हा मी हॉस्पिटलमध्ये जाऊ शकले. वाटेत ते मला म्हणाले, ''इट इज रिअली गॉड्स मिरॅकल! ही खरंच देवाची कृपा आहे, तुम्हाला काय सांगू कळत नाही, माझ्या अख्ख्या आयुष्यामध्ये मी अशी गोष्ट बघितलेली नाही, तिसऱ्या मजल्यावरून पडूनही अखिलला काही झालेले नाही. तो एकदम ठीकठाक आहे.''

पण हॉस्पिटलमध्ये जाऊन अखिलला मी माझ्या नजरेने बघेपर्यंत मला धीर नव्हता. त्याला इर्मजन्सी वॉर्डमध्ये ठेवले होते आणि ग्लुकोज वगैरे चढवले होते. मी जेव्हा वॉर्डमध्ये गेले तेव्हा तो जागाच होता, त्याच्या अंगावर ब्लँकेट घातले होते. तो तेव्हा मला एक वाक्य बोलला, ''मम्मी! मला ना, तुला काहीतरी सांगायचंय''; पण त्याचे काहीही ऐकून घ्यायची माझी मन:स्थिती नव्हती. मीच त्याचे तोंड गप्प केले आणि त्याच्या पायाशी जाऊन ब्लँकेटच्या आतमध्ये हात सरकवला आणि त्याचे दोन्ही पाय व्यवस्थित आहेत की नाही, हे चाचपडून बघितलं. कंबरेपर्यंत आणि मग हातही खांद्यापर्यंत तपासले. सर्व ठाकठाक बघून सुटकेचा निःश्वास टाकला, पण त्यावेळी मला बापूंचे आभारही मानायचे लक्षात राहिले नाहीत.

नर्सही येऊन मला म्हणाली, ''तुमचा मुलगा एकदम ठीक आहे, काही प्रॉब्लेम नाही. रात्री नऊ वाजता डॉक्टर आल्यावर तुम्ही त्याला डिस्चार्ज करून घरी घेऊन जाऊ शकता.'' म्हटले, ''ठीक आहे.''

तशी मी खूप हळवी आहे, पण त्यावेळी माझे मिस्टर माझ्यापेक्षा जास्त हळवे झाले होते. बापूंनी मला हे सहन करण्याची ताकद दिली. माझा मुलगा मला विचारत होता की ''मम्मी, पप्पा कशाला रडत आहेत?'' मी म्हटले, ''काही नाही रे! असंच.''

मग मी मिस्टरांना, रात्री डॉक्टर येण्याच्या वेळेस यायला सांगून जेवणाकरिता घरी पाठवले. ते मुलासमोर रडत राहिले असते, तर कदाचित त्याला अजून काही काही वाटत राहील असे वाटले.

मात्र एरवी नऊ वाजता येणारे डॉक्टर, कुठल्यातरी मीटिंगमुळे साडेनऊ दहा वाजता आले. त्यांनी एकंदरीत अखिलला तपासून काही प्रॉब्लेम नसल्याचे सांगून, त्याला एक वेदनाशामक इंजेक्शन दिले व ''तुम्ही डिसचार्ज घेऊ शकता'' असे ते सांगत होते, तेवढ्यात....

नेमके ते डिस्चार्जविषयी सांगत होते, तेवढ्यातच अखिलने उलटी केली. मग डॉक्टर मला म्हणाले, ''आम्हाला अखिलला हॉस्पिटलमध्ये देखरेखी-खाली ठेवावे लागेल, त्यामुळे तुम्ही त्याला घरी घेऊन जाऊ शकत नाही.'' मग मी मिस्टरांना सर्व कल्पना देऊन बोलावून घेतले व मिस्टर आल्यावर आम्ही परत अखिलला ॲडमिट करून घेतले. त्यांच्या सगळ्या औपचारिकता पूर्ण होईपर्यंत रात्रीचे साडेबारा वाजले. साधारण एक-दीडच्या सुमारास अखिलने दुसऱ्यांदा उलटी केली. नर्सने डॉक्टरांना ते कळविल्यावर डॉक्टर म्हणाले की ''अजून थोड्या वेळाने अखिलने उलटी केली तर त्याला मस्कतच्या गव्हर्न्मेंट हॉस्पिटलमध्ये हलवावे लागेल.''

'गव्हर्न्मेंट हॉस्पिटल' हे नाव ऐकल्यावर तर मी खूपच घाबरले कारण तिकडच्या नियमांप्रमाणे गव्हर्न्मेंट हॉस्पिटलमध्ये हलवले तर ती पोलीस केस होते. जर पोलिसांना कळले की घरात कोणी नसताना लहान मुलाला एकटे सोडले होते आणि तेव्हा ही दुर्घटना घडली; तर या दुर्घटनेसाठी आई-वडिलांना जबाबदार धरून त्यांना तुरुंगात टाकतात. त्यानंतरची संपूर्ण प्रक्रिया खूप किचकट आणि मोठी असते.

हे सर्व मनात आल्यामुळे माझी पाचावर धारण बसली. इथे आम्हाला काहीच करता येणार नसल्यामुळे आता आमचा तारणहार बापूच होते. मी जिवाच्या आकांताने बापूंना मनोमन प्रार्थना केली की ''बापू! कृपा करून आम्हाला तिथपर्यंत पोहोचवू नका. जी काही ट्रीटमेंट आहे ती इकडेच करून घ्या. सरकारी हॉस्पिटलमध्ये जायची माझी इच्छा नाही.''

त्या दिवशी पूर्ण रात्रभर मला झोप नव्हती. डोके सुन्न झाले होते, तरीही रात्री माझे जमेल तसे घोरकष्टोद्धरण स्तोत्रपठण चालूच होते. बापूंचे नामस्मरणही सुरूच होते. त्या रात्रीत त्याने चार-पाच वेळा उलटी केली. तेव्हा ती नर्स मला म्हणाली की ''आता सकाळी ९ वाजता डॉक्टर आल्यानंतर तुम्हाला अखिलला गव्हर्मेंट हॉस्पिटलमध्ये हलवावे लागेल.'' आमचा निरुपाय होता.

सकाळी ९ वाजता डॉक्टरांची फेरी होती. त्यांनी अखिलला तपासल्यावर ते पुढील प्रोसीजरला लागणार एवढ्यात मला कसे काय आठवले कोण जाणे, पण मी डॉक्टरांना सांगितले की, ''डॉक्टर, उलटी होणे ही त्याची शरीरप्रवृत्ती आहे कारण ज्यावेळी अखिलला ताप येतो त्यावेळी तो उलटी करतोच.''

हे ऐकून डॉक्टर थबकले व जरा विचार करून म्हणाले, ''हो का? मग जर ताप आल्यावर उलटी करणे ही त्याची शरीरप्रवृत्ती आहे तर मी त्याला एक इंजेक्शन देतो. त्या इंजेक्शनने त्याच्या उलट्या थांबल्या तर ठीक!'' असे म्हणून डॉक्टरांनी त्याला इंजेक्शन दिले आणि काही तासांचा अवधी दिला. मात्र ''त्या कालावधीमध्ये अखिलला उलटी होता कामा नये'' असे डॉक्टरांनी सांगितले. मी बापूंना पुन्हा कळवळून मनोमन प्रार्थना केली की ''बापू! प्लीऽऽज त्या इंजेक्शनने त्याच्या उलट्या थांबवा.''

सद्‌गुरुकृपेने त्याच्या उलट्या थांबल्या. त्याने माझ्याकडे हट्ट केला की मला आता उपासना सेंटरला घेऊन जा कारण दुसऱ्या दिवशी गणपतीचे आगमन होते. केंद्रातले सर्वजण गणपती आगमनाच्या तयारीत असल्याने मला कोणालाच त्रास द्यायचा नव्हता म्हणून मी आमच्यासोबत घडलेल्या प्रसंगाची माहिती केंद्रात कोणालाच कळवली नव्हती. सकाळी सव्वासहाला मी आमच्या 'अनिरुद्ध उपासना केंद्र-मस्कत'चे प्रमुख सेवक सुधीरसिंह

नाईक यांना फोन केला आणि त्यांना घडलेली घटना सांगितली. अखिल तिसऱ्या मजल्यावरून पडला, हे ऐकून त्यांनाही जबर धक्का बसला. पण तिसऱ्या मजल्यावरून पडूनही त्याला काहीही झालेले नाही, हे कळल्यावर त्यांचा विश्वासच बसेना.

सरकारी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्याची गोष्ट त्यांच्या कानावर घातली असता ते म्हणाले, ''तू काही काळजी करू नको, आपण बघूया! तू आमच्या संपर्कात रहा.'' उपासना केंद्रातील कोणालाच न कळवता रात्रभर हॉस्पिटलमध्ये एकटी राहिल्याबद्दल ते आम्हाला ओरडले.

इथे डॉक्टर म्हणाले, ''मी त्याला संध्याकाळी डिस्चार्ज देतोय. तुम्ही त्याला घरी घेऊन जाऊ शकता.''

हे शब्द ऐकून मी मनोमन बापूंना असंख्य वेळा 'थँक्स' म्हटले, ''थँक्स् बापू! तुम्ही इकडच्या इकडेच सगळ्या अडचणी दूर केल्यात, थँक्स्!'' आणि मग संध्याकाळी आम्ही त्याला घेऊन घरी आलो.

त्याने हट्ट धरला होता की त्याला केंद्रावर जाऊन गणपतीचे दर्शन घ्यायचेय. मग मला सगळे म्हणाले की ''तो एवढा म्हणतोय तर त्याला घेऊन केंद्रावर गणपती बघायला तू जा.'' मग आम्ही घरी येऊन फ्रेश होऊन गणपतीच्या दर्शनाला गेलो. इथपर्यंतचा माझा अनुभव.

पण अखिल पडला, त्यानंतर पुढे काय झाले? कसा पडला? हे आम्हाला कोणालाच काहीही माहिती नव्हते व एवढ्या सगळ्या गोंधळात त्याची माहिती करून घ्यायचेच राहिले होते. त्यातील बरीचशी माहिती, फक्त ज्यांनी अखिलला हॉस्पिटलमध्ये उचलून नेले ते माझे शेजारी 'सुरेंद्र' ह्यांनाच होती. म्हणून त्यांना भेटायला व त्यांचे आभार मानायला आम्ही त्यांच्या घरी गेलो.

आम्ही म्हणालो, ''सुरेंद्रजी, थँक्स!'' तेव्हा ते म्हणाले, ''तुम्ही माझे आभार कसले मानता? तुमची ज्यांच्यावर श्रद्धा आहे, त्यांचे आभार माना कारण त्यांनीच तुमच्या मुलाचे प्राण वाचवले आहेत.''

आम्ही बुचकळ्यातच पडून त्यांना नेमके काय झाले होते, ते विचारले. तेव्हा त्यांनी मला पुढची गोष्ट अशी सांगितली, ती त्यांच्याच शब्दांत....

खालून खूप गोंधळ आणि आवाज येत होता म्हणून मी सहज खिडकीतून बाहेर डोकावून बघितले तर अखिलला मी काही अंतरावर उलटा झोपलेला पाहिले. त्याच्या आजूबाजूला अनेकजण गोळा झाले होते पण कोणीही त्याला उठवण्याचा प्रयत्न केला नाही. मग मी माझ्या दोन्ही लहान मुलांना शेजारच्यांकडे ठेवले आणि ताबडतोब खाली आलो आणि अखिलला उचलले. त्याला थोडा श्वास घ्यायला त्रास होत होता त्यामुळे त्याला तिथल्या तिथे कृत्रिम श्वास दिला, पण अखिल शुद्धीत होता.... बोलत होता.... तुम्हाला बोलवत होता आणि रडत होता....

मग मी ॲम्ब्युलन्सला फोन केला. पण ॲम्ब्युलन्स येण्यासाठी किमान १ तास लागेल असे ॲम्ब्युलन्सच्या ड्रायव्हरने सांगितले. एवढा वेळ फुकट घालवण्यापेक्षा एखादी टॅक्सी वगैरे मिळते का पहावे म्हणून मी अखिलला घेऊन थोडासा रस्त्यावर आलो, तेवढ्यात बाजूने एक टॅक्सीवाला आला आणि त्याने मला स्वत:हून विचारले की ''तुम्हाला कुठे जायचे आहे?'' मी त्याला एवढेच सांगितले की ''ह्या मुलाला थोडे बरे नाही तर ह्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन चल''. हॉस्पिटलचे नावही सांगितले नाही कारण मी पण मस्कतमध्ये नवीन होतो.

त्याने मला थेट ह्या हॉस्पिटलच्या दारापाशी नेले. मी तुमच्या अखिलला उचलून हॉस्पिटलमध्ये शिरतच होतो, तर नेमके लहान मुलांचे डॉक्टर, जणूकाही आमचीच वाट पाहत असल्यासारखे समोर उभेच होते.

मी त्यांना म्हटले की ''इर्मजन्सी आहे, हा मुलगा इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून खाली पडलाय.''

त्या डॉक्टरांनी पटापट अखिलला तपासले आणि ते म्हणाले की, ''बाहेरून त्याला काही जखम झालेली दिसत नाही, पण आपण स्कॅनिंग करून शरीराच्या आतमध्ये काही फ्रॅक्चर आहे किंवा नाही ते तपासायला हवे.''

सुरेंद्रजींच्या म्हणण्याप्रमाणे परिस्थिती अशी होती की त्यांना कुठेही कुठलाच त्रास झाला नाही. सर्वकाही जणू कोणीतरी आधीच सगळी सेटींग केलेली असल्याप्रमाणे आपसूकच घडत गेले. स्वत:हून टॅक्सीवाल्याने विचारणे....हॉस्पिटलचे नाव न सांगता हॉस्पिटलमध्ये घेऊन जाणे..... समोरच लहान मुलांचे डॉक्टर उभे असणे...त्यांनी पटापट तिथेच तपासून स्कॅनिंग करणे....गोष्टी एवढ्या भरभर होत होत्या की त्यांना समजतच नव्हते की हे काय चाललंय? आणि ते यंत्रवत सगळ्या गोष्टी आपसूक करत होते.

ते म्हणाले, ''मी पहिलाच एवढा आश्चर्यचकीत झालो कारण अखिलने खिडकीतून उडी मारल्यावर वास्तविक तो तिथेच खाली पडला पाहिजे होता, पण अखिल खिडकीच्या खाली न पडता काही फूट अंतरावर मुलगा जसा झोपतो तसा झोपला होता. नंतर लोकांचा आवाज ऐकून मी खाली येऊन त्याला उचलल्यावर तो म्हणाला की त्यालाही काही समजले नाही.''

सुरेंद्रजींच्या तोंडून हे सर्व ऐकून मला पुरेपूर खात्री पटली की सद्गुरुंच्या कृपेशिवाय हे सर्व अशक्य आहे व तसे मी त्यांना बोलून दाखविले. यावर सुरेंद्रजीही म्हणाले की त्यांनीही पहिल्यांदाच आयुष्यात असा अनुभव घेतला.

त्यानंतर काही दिवस अखिलचे अंग थोडेसे दुखत होते. तिकडच्या बऱ्याच लोकांनी आम्हाला सांगितले की तुम्ही मस्कतच्या डॉक्टरांवर अवलंबून न रहाता त्याला भारतात घेऊन जा आणि तिथल्या डॉक्टरांना दाखवा.

खरे तर ही घटना घडून चार-पाच दिवस झाले तरी भीतीपोटी मी इकडे भारतात माझ्या घरच्या लोकांना काही कळवले नव्हते. त्यांना कळवायला मी घाबरत होते कारण त्याच वर्षी सुट्टीत मी भारतातून मस्कतला परत येताना माझ्या घरच्यांनी मला आवर्जून सांगितले होते की ''तुझ्या घराला जाळ्या नाहीत, अखिल एवढा मस्ती करतो तर तू गेल्या-गेल्या जाळ्या लावून घे नाहीतर कधीतरी हा उडी मारेल आणि काहीतरी करून बसेल.''

तिकडे मस्कतमध्ये कितीही मोठा टॉवर असला तरीही जाळ्या लावायची परवानगी नाही. फक्त खिडक्या....बस्स!

नंतर जेव्हा मी त्यांना कळवले तेव्हा सांगितले की ''अखिल जिन्यावरून पडला, पण बापूकृपेने त्याला काही झालं नाही. तो व्यवस्थित आहे.'' घरच्या लोकांनी त्यावेळेस ते ऐकून घेतले, पण बहुधा त्यांचा विश्वास बसला नसावा. कारण मला रात्री पुन्हा त्यांचा फोन आला आणि म्हणाले, ''आम्हाला खरं सांग! अखिल जिन्यावरून पडला की खिडकीमधून?''

मग मात्र माझा नाईलाज झाला आणि मला खरे बोलावेच लागले. जेव्हा त्यांना सांगितले की ''अखिलने खिडकीतून उडी मारली'' तेव्हा हे ऐकून इकडे आमच्या कुटुंबातल्या लोकांना धक्का बसला. माझी बहीण चक्कर येऊन पडली. ते म्हणाले, ''....आणि तू म्हणतेस तो व्यवस्थित आहे?'' मी म्हटले, ''हो! अगदी व्यवस्थित आहे, एक थेंबही रक्त गेले नाही.'' त्यावर ते म्हणाले, ''अगं! तू किती खोटं बोलशील?''

मी म्हटले, ''मी खरंच बोलते आहे! बापूंच्या फोटोसमोर उभी राहून मी खोटे बोलीन का?'' असे मी म्हटल्यावर त्यांनी अखिलशी प्रत्यक्ष बोलून खात्री करून घेतली. तो व्यवस्थित असल्याचे पाहून त्यांचा जीव भांड्यात पडला; पण त्याला काही साधे फ्रॅक्चरसुद्धा नाही, हे त्यांना पटत नव्हते. थोड्या वेळाने त्यांनी फोन ठेवून दिला.

घरच्यांच्या अजूनही थोड्या शंकाकुशंका होत्याच. त्या सगळ्यांनी मला भारतात येऊन त्याची पुन्हा तपासणी करून घेण्यासाठी खूप आग्रह केला. त्यांच्या मते, ''आज तो लहान आहे, त्याच्या मेंदूला काही झाले असेल तर लगेच काहीच कळणार नाही. उद्या मोठा झाल्यावर कळेल.''

हे ऐकून मिस्टरांनी मुंबईला जायची सगळी तयारी केली. पण माझा माझ्या सद्‌गुरुंवर पूर्ण विश्वास होता. मी म्हटले, ''मी इथेच राहणार आणि त्याचे जे काही पुढचे उपचार असतील ते मी इथेच करीन.''

खरं तर डॉक्टरांनी अखिलला आठ दिवसांनंतर शाळेत पाठवायला सांगितले होते. आठ दिवसानंतर अखिल शाळेत गेला तेव्हा त्याला अभ्यासाबाबत कोणतीच अडचण आली नाही, फक्त थोडे अंग दुखत होते.

पण तरी हे ऐकून मिस्टर मुंबईला जाण्याचा आग्रह करू लागले. पण मी म्हणाले, ''नाही. आपल्या बापूंमुळे अखिल इज फाईन अँड फिट, मग मी मुंबईला जाणार नाही.''

मुंबईला येण्याचा प्रश्न तर निकालात निघाला, पण अखिल आंघोळीला बसताना वगैरे कण्हणायचा, थोडा तिरपा चालायचा. काही दिवसांनी तो अक्षरश: तिरपा चालायला लागला तेव्हा आम्ही परत घाबरून तिकडच्या डॉक्टरांकडे गेलो. त्या डॉक्टरांनी आम्हाला ऑर्थोपेडीक डॉक्टरांकडे पाठवलं. त्याचा एक्स-रे वगैरे काढल्यानंतर डॉक्टर म्हणाले, ''ही इज फाईन अँड फिट. वरून पडल्यामुळे कुठेतरी हाडाला दाब बसला असेल त्यानेच जरा दुखत असेल, ते होईल व्यवस्थित. तुम्ही काही काळजी करू नका.''

त्यानंतर मी जेव्हा अखिलला म्हटले, ''बघितलं ना, किती दुखते ते! मग तू का उडी मारलीस खिडकीतून?'' तर तो मला म्हणाला की ''आई! मला एक सांगायचे आहे.'' त्याला हॉस्पिटलमध्येही मला काहीतरी सांगायचे होते, पण मी त्याला चूप केले होते, ते मला आठवले.

त्याने सांगितले की जेव्हा तो खाली पडत होता तेव्हा एका लाटेप्रमाणे तरंगत खाली येत होता! त्याला खूप थंड थंड हवा लागत होती आणि त्याला एक अदृश्य माणूस दिसला. अदृश्य म्हणजे त्याला फक्त त्याचे दोन हात आणि दोन पाय दिसले.

मी त्याला ताबडतोब विचारले, ''बापू दिसत होते का?'' तर तो म्हणाला, ''नाही! अदृश्य माणूस होता.'' सात वर्षाचा मुलगा मला जास्त काय सांगणार? पण मला मनोमन ठाम विश्वास होता की ते माझे बापूच होते. ह्याच्यावर विश्वास ठेवणे कोणाला जड जाऊ शकते, पण माझ्या शेजाऱ्यांनीदेखील असेच वर्णन केले होते, नाही का? त्यांनी मला सांगितले होते की 'खिडकीतून जरा खाली वाकून बघा! खालच्या सर्व मजल्यांवर राहणाऱ्यांच्या टी.व्ही वायर्स....एसीज्....लोखंडी बार....पायऱ्या आहेत. पण अखिल तिथे न पडता काही अंतरावर उलटा झोपला होता.' खरंच! यावर विश्वास बसणेच अशक्य होते.

आज अखिल इंजिनियरींग शिकत आहे. आता तो ठीकठाक आहे, ही अक्षरश: बापूंची कृपा. त्यावेळेला मला वाटत होते की मी समुद्रपार एवढ्या लांब ह्या देशात एकटी आहे....माझ्यासोबत घरचे कोणी नाही....पण त्यानंतर मला जाणवले की मी एकटी नव्हते. माझ्यासोबत माझे बापू होते. या देशातल्या नियमांमधून कुठेही काहीही प्रॉब्लेम न येता बापूंनी अगदी व्यवस्थित आम्हाला बाहेर काढले. जरी असं म्हटले की अखिलच्या बाबतीत जे घडले ते आमचे प्रारब्धाचे भोग होते व ते आपण भोगले पाहिजेत; पण तिथेही बापूंनी अखिलला व्यवस्थित सांभाळले.

नंतर मला तेथील बऱ्याच लोकांकडून कळले की त्यांनी एका मुलाला उंचावरून अलगद खाली येताना पाहिले, तेव्हा त्यांचा विश्वास बसत नव्हता. सगळे म्हणत होते की इतक्या उंचीवरून मुलगा धापकन खाली पडला पाहिजे, पण हा मुलगा मात्र हळूहळू झोके घेत खाली येत होता.

मी जेव्हा त्याच्यावर रागावले त्यावेळी त्याने अतिशय शांतपणे मला सांगितले की ''आई! माहित आहे? वरून काय मऽस्त वाटत होतं!''

अर्थात मी त्याला दटावले, ''अखिल! बाबा रे, त्या दिवशी बापूंमुळेच वाचलास, नाहीतर हे अशक्यच आहे.''

एवढ्या वरून खाली पडल्यावर किमान दोन तीन हाडं मोडू शकतात.... थोडी जखम होऊ शकते.....खरचटते.....किंवा थोडे रक्त तरी जातेच.... पण....अखिल जेव्हा खाली पडला तेव्हा बापूकृपेने असे काही झाले नाही. म्हणून तर मी बापूंना म्हटले, ''बापू! मला माफ करा, मी चुकले...त्या दिवशी मी अक्षरश: तुमच्याकडे बोट दाखवून तुमच्याशी भांडले....माझी मन:स्थिती बरोबर नव्हती....आत्ता मला माझी चूक कळली. श्रीराम, अंबज्ञ, बापू, की अखिल आज व्यवस्थित आहे.'' बापूंच्या कृपेने आम्हीदेखील आनंदी आहोत.

आज मी अखिलला सांगते की ''अखिल आता तू माझा नाही, तर बापूंचा मुलगा आहेस, हा तुझा जणू पुनर्जन्मच आहे.'' आमची बिल्डींग म्हणजे आता एक पिकनिक स्पॉटसारखी झाली आहे. मुंबईहून पहिल्यांदा कोणी बापूभक्त आमच्या मस्कत उपासना केंद्रावर आले की ते म्हणायचे, ''अहो! पहिल्यांदा आम्हाला ती बिल्डींग दाखवा जिथून अखिल पडला, आम्हाला ती बघायची आहे.'' जेवढे बापूभक्त मुंबईवरून मस्कतला आले होते ते सर्व आम्ही रहात असलेली बिल्डींग बघून आश्चर्यचकीत व्हायचे. मग मी त्यांना सांगायचे, ''बघा! अखिल तुमच्या समोरच आहे. बापू आमचे नुसते सद्‌गुरू नसून ते आमचे सर्वस्व आहेत!''

हा तर खूपच मोठा अनुभव, पण रोजच्या दैनंदिन आयुष्यातही लहान-सहान अनुभव येतच असतात. जेव्हा कधी-कधी थोडेसे काहीतरी मनाविरुद्ध झाले की 'काय हो बापू?' असा विचार मनात येताच लगेच अखिलचा अनुभव आठवतो. हा अनुभव अजूनही इतका ताजा आहे की असा एकही दिवस जात नाही जेव्हा मला हा अनुभव आठवला नाही. मी भक्तीत कुठेतरी मागे पडतेय असे जेव्हा मला जाणवते तेव्हा मी ह्या अनुभवाची पुन्हा उजळणी करते आणि स्वत:ला परत ताळ्यावर आणते.